ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१ !




jpp51_51@jnanaprabodhini.org

गोष्ट क्र. ५

३१ जानेवारी २०२१

## *नरेन्द्र देशमुख*

*(१९७५- १९८१)*



कुठलेही काम
प्रामाणिकपणाने केले
आणि आपण आपल्या
कामाला महत्त्व दिले तर
इतर लोक देखील
त्याला महत्त्व देतात.
‘धर्मो रक्षति रक्षित:’ ह्या
उक्तीचा प्रत्यय मला
आला. व्यवसायात आपण
आपल्या मूल्यांपासून
ढळलो नाही तर निश्चित
यश मिळते.

नेता स्वत: सर्वांगीण बाजूने
संतुलित व्यक्तिमत्त्वाचा
आणि धाडसी असायला
हवा. आपल्याला काय क
ळत नाही हे त्याला कळून
मग ते काम समजणारे
लोक नेत्याला जोडता
आले पाहिजेत.

### प्रशाला, युवक विभाग व मा. आप्पा

इयत्ता पाचवीत ज्ञान प्रबोधिनीत १९७५ मध्ये प्रवेश मिळाल्यानंतर खूपच आनंद झाला होता. माझा मोठा भाऊ धनंजय (सरदार !!) प्रशालेत असल्यामुळे काही कार्यक्रमानिमित्त व विशेषत: ग्रंथालयात माझे येणे जाणे असायचे. मोठे ग्रंथालय व तिथे पुस्तकांना मुक्तपणे हाताळण्याचे स्वातंत्र्य याचे विशेष आकर्षण होते. त्याकाळी पुस्तकांना हाताळायचे इतके स्वातंत्र्य मला आधी कुठेच नव्हते. सरळ आत जायचे आणि मोठमोठ्या रॅकवरून पुस्तके घेऊन वाचायची. मग कधीतरी कुठले तरी पुस्तक फार आवडले तर ते अन्य पुस्तकाच्या मागे लपवून आधीचे पुस्तक संपले की ते घ्यायचे अशी गम्मत होती. इथे प्रशालेत आम्ही 'wanted' मुलं होतो हे निवड प्रक्रियेपासूनच जाणवले होते. आम्हाला शिकवण्यात, घडविण्यात इथल्या शिक्षकांना खरोखरीच रस होता. मुलांप्रमाणेच शिक्षकही निवडून आणले होते. अशा 'मोठ्या' शिक्षकांकडून शिकायला आम्ही त्या अर्थाने खूप लहान होतो.



**शिवापूर जवळ सुमारे १९७८ साली**

यशवंतरावांनी शिकवलेले मराठी शुद्धलेखन आजही उपयोगी पडते. 'पुस्तकात पाहून अनुलेखन करताना पुस्तकात चूक असेल तर ती तुमच्या लेखनात देखील यायला हवी, असे अनुलेखन उत्तमतेने करायला हवे' असे त्यांच्याकडून शिकलेले उदाहरण मी आजही माझ्या कर्मचाऱ्यांना देत असतो. त्यांनी पसायदानाची ओळन्ओळ उलगडून शिकविली, तशीच सावळ्याची 'खबरदार जर टाच मारूनी' ही कविताही गात गात शिकविली! विनयराव हर्डिकर स्वत: एक पत्रकार, कवी, कार्यकर्ते, आम्हाला काही काळ इंग्रजी शिकवायचे. मी इंग्रजी शाळेतून आल्यामुळे ते तास सुरू झाला की मला साांगायचे, आता ग्रंथालयात जाऊन बस आणि तास संपायच्या आधी इंग्रजीमध्ये कविता लिहून आण! मग मी बसून कविता करून घेऊन यायचो. एका पाचवीच्या मुलाकडून एवढ्या विश्वासाने ते कविता करवून घ्यायचे ह्याचे अप्रुप वाटायचे. वेगवेगळ्या प्रकारच्या कविता आणि गाणी म्हणवून घ्यायचे. अविदाची तेंव्हाच भेट झाली. त्याने इतिहास विषयाची करून दिलेली ओळख लक्षात आहे.

विसूभाऊ आम्हाला बालदलावर प्रतोद होते. न्यू इंग्लिश स्कूल आणि उपासना मंदिरात त्यावेळी दल व्हायचे. विसूभाऊ आम्हाला जिमनॅस्टिक्स् शिकवायचे, उत्तम पद्ये गायला शिकवायचे. अनेक पद्ये त्यांनी दलावर आणि वर्गात गाऊन घेतली. आमच्या सहावीत त्यांनी मानवी मनोरे बसवून घेतले. गणेश मिरवणुकीत आम्ही बेलबाग चौकापासून ट्रकवर विविध प्रकारचे मनोरे सादर केले होते. मी छोटा असल्याने बऱ्याचदा माझे काम सर्वांत वरच्या स्तरावर जाऊन झेंडा रोवण्याचे असायचे.



**क्रीडा प्रात्यक्षिके १९८२**

शरदराव सुंकरांचा प्रेमळ सहवास तेव्हाच लाभला. वर्गात त्यांच्या तासाला शिकवण्यापेक्षा मला त्यांनी सांगितलेल्या गोष्टीच जास्त आठवत आहेत. एकदा सकाळ नाट्यवाचन स्पर्धेसाठी 'अश्रूंची झाली फुले' हे नाटक त्यांनी आमच्याकडून बसवून घेतले आणि सुवर्ण पदकही जिंकवले! त्यांच्यासह भाई व मोहनरावांनी आमचे एक पूर्ण शिबिर 'संचलन शिबिर' म्हणून घेतले होते. ते स्वत: इतके प्रकार कधी व कुठे शिकून आले होते हे आश्चर्यच होते. वेगवेगळ्या प्रकारच्या आज्ञा आम्ही त्या शिबिरात शिकलो. खूप मजा यायची. त्या शिबिराच्या समारोपाला पुण्याचे पोलिस अधिक्षक आले होते आणि त्यांनी माझ्या लोकांपेक्षा तुमची मुले अधिक चांगले संचलन करतात असा अभिप्राय दिला होता. शरदरावांची दुसरी एक आठवण म्हणजे विस्तार शिबिराची. मी तेव्हा सातवीमध्ये होतो आणि शरदरावांसोबत धुळ्याला गेलो होतो. तिथे एका कुटुंबासोबत आणि शाळेत राहून तेथील मुलांचे शिबिर त्यांनी घेतले. त्यावेळी शरदरावांनी 'सृष्टीच्या मुळारंभी काय होते?' अशा विषयवार एका सभागृहात सार्वजनिक व्याख्यान दिले होते व ते ऐकल्यावर अनेक प्रश्न विचारून मी त्यांना भंडावून सोडलेले आठवते आहे!

७वी-८वीमध्ये असताना अजितराव कानिटकर आमचे दलप्रतोद होते. तेव्हा पथकश: रचना दलावर असायची. त्यामध्ये मी महर्षी दयानन्द पथकाचा पथक प्रमुख होतो. वेगवेगळ्या पथकश: स्पर्धा असायच्या. मैदान तयार करणे, स्वच्छ करून झाऱ्यांनी पाणी मारणे, फक्की आखणे अशी कामे असायची, त्याचे गुणपत्रक फलकावर लागायचे आणि त्याची खूप उत्सुकता असायची.

अशीच अनेक हिवाळी शिबिरे आठवतात. थंडीच्या दिवसांत पहाटे बनियनवर गारठून जायचो. सकाळी लवकर

क्रीडांगण, सकस आहार, वैचारिक, भोजन, विश्रांती, पुन्हा संध्याकाळचे क्रीडांगण, सहभोजन, वैचारिक असे वातावरण असायचे. असे जवळपास आठवडा – दोन आठवडे शिबिर चालायचे. आम्ही रांझे ते कल्याण असा रस्ता बांधण्याच्या कामासाठी श्रमदान करायलाही गेलो होतो.

हिवाळी शिबिरांत क्रीडांगणावरून वास्तूत आलो की आप्पा आम्हाला होमीओपॅथीच्या गोळ्या द्यायचे. मुलांना थंडी बाधू नये म्हणून ते काळजी घ्यायचे. आप्पांच्या युवक विभागाला 'संचालक भेटी' असायच्या. वार्षिक क्रीडा प्रात्यक्षिके होत तेव्हा आप्पा असायचेच. ह्या सगळ्याची तयारी दोन महिने आधी पासून सुरू व्हायची आणि त्यामध्ये आप्पांचे भाषण होणार हे ठरलेले असायचे. न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर मंच बांधलेला असायचा त्यावर आप्पा उभे राहायचे आणि आम्ही सगळे समोर मैदानावर रांगेत बसून त्यांची भाषणे ऐकायचो. क्रीडा प्रात्यक्षिकांअखेरीस त्यांचे भाषण विशेष स्फूर्तीदायक आणि दिशादर्शक असे.

मा. आप्पा आमच्याशी संवाद साधायला अनेकदा वर्गात यायचे . मी वर्गाचा मॉनिटर असल्याने एखादा तास मोकळा असला की आम्ही आप्पांच्या कार्यालयात जायचो आणि विचारायचो, आप्पा येता का? आणि ते मोकळे असले की कसलेही आढेवेढे न घेता हो, येतो की! म्हणायचे आणि यायचे. मग त्या तासाला गोष्टी, चर्चा, चरित्र कथन असे चालू राहायचे. त्यांची अनेक पुस्तके होती त्यातील, मुख्यत: 'विवेकानंद काय म्हणाले' मधील उतारे ते आमच्याकडून पाठ करून घ्यायचे. त्यांनी गच्चीवर बसून शिकविलेल्या बासरीच्या दोन धूनी आजही मला येतात.


आप्पांच्या कार्यालयासमोरून जाताना कधी ते सामोरेच आले की हात पकडायचे आणि त्यांच्या खोलीत घेऊन जायचे. आरामात त्यांच्या खुर्चीवर बसून मलाही बाजूला बसवायचे. हात हातात घेऊन डोळे मिटून अलगद तो छातीवर हृदयापाशी ठेवून बोलायचे, मोठे झाल्यावर काय करणार तुम्ही? लोकांसाठी काय करणार? असे विचाराचे. ते कधी लहानांनाही अरे-तुरे म्हणायचे नाहीत. मी लहानच होतो पण काहीतरी उत्तरे द्यायचो. त्यांना नेहमी मुलांशी संवाद साधायला आवडायचा. कदाचित असे बोलून आपल्या हृदयातून थेट त्या मुलाच्या हृदयाशी काहीतरी पोचवतोय अशा भावनेने तो हात छातीपाशी ठेवून मोकळा संवाद साधायचे. आम्ही आप्पांच्या शाळेत शिकायचो त्यामुळे घरच्यांना काही चिंता वाटायची नाही. क्वचित कधीतरी पालक शोधत यायचे आणि त्यांना आम्ही प्रबोधिनीमध्येच सापडायचो. त्याकाळी रात्री ९-१० पर्यंतही आम्ही शाळेत थांबायचो. माझा मोठा भाऊ माझ्याहून चार वर्षांनी मोठा होता आणि तो नंतर राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये गेला. त्यावेळी माझे वडील एकदा आप्पांना भेटायला गेले असताना आप्पा म्हणाले, तुम्ही एक मुलगा देशाला दिलेला आहे. मला दुसरा मुलगा प्रबोधिनीला द्या! अशा लाघवी स्वभावामुळेच आप्पांनी अनेक माणसे जोडली असावीत. कितीतरी मोठी व्यक्तिमत्त्वे आप्पांच्या प्रेमात होती. त्यामुळे अनेक अडचणींवर ते सहज मात करू शकले. आपण शाळा का स्थापन केली आहे आणि आपण मुलांसाठीच हे करतोय, हे त्यांना चांगलेच ठाऊक असल्याने ते आम्हाला खूप वेळ द्यायचे. आम्हाला घडवायची एकही संधी ते सोडायचे नाहीत. आपल्या स्वप्नपूर्तीसाठी असे प्रामाणिक समर्पित आयुष्य जगणारे आप्पा आम्हाला पहायला मिळाले हे आमचे केवढे सद्भाग्य !



**प्रिय वडिलांसह**

माझी १९८३ मध्ये बारावी झाली तेव्हा आप्पा आजारी असायचे. मी मुंबईला कॅालेज मध्ये प्रवेश घेतला होता आणि महिन्याभरातच पेपरला बातमी वाचून मला कळाले की आदल्या दिवशी आप्पा गेले. मी तडक पुण्याला आलो, प्रबोधिनीत अजितराव भेटले व त्यांनी सांत्वन केल्याचे आठवतंय.

मा. वामनरावांचे अध्यापन ते प्राचार्य असतानाही खूप लाभले. गणित, इंग्रजी, संस्कृत त्यांनी उत्तम शिकवले. त्यांची शिकवण्याची तळमळ व प्रेम दोन्ही जाणवायचे. तशाच अत्यंत प्रेमळ अशा दीपाताई पिल्ले आमच्या दीर्घकाळ वर्गशिक्षिका होत्या.



**दोन गुरुवर्यांसह**

११-१२वीत मी आरंभ महाविद्यालय म्हणजे प्रशालेतच होतो. आधी स. प. महाविद्यालयात प्रवेश घेऊन ठेवला होता, मात्र आरंभ महाविद्यालय नक्की झाले आणि मग मी तो प्रवेश रद्द केला. त्यामुळे आम्हाला आणखी दोन वर्षे

प्रबोधिनीमध्ये राहता आले. युवक विभाग प्रतोद म्हणून भाई म्हणजे विवेकानंद फडके आणि प्राचार्या म्हणून पुष्पाताई आगाशे काम पहात होत्या. भाई अतिशय प्रेमळ आणि तरुणांशी सहज गप्पा मारू शकणारे व्यक्तिमत्त्व होते. कुठली पुस्तके वाचली? नवीन कुठला विषय अभ्यासला अशा आमच्या रोज संध्याकाळी चर्चा व्हायच्या. दलावर आम्ही फुटबॉलचा संघ बनवला होता आणि आंतरशालेय स्पर्धांनाही उतरलो होतो. आमच्या गणपतीच्या मिरवणुकीवर एकदा मशिदीजवळ दगडफेक झाली. बाकी लोक घाबरले पण आम्ही घाबरलो नाही आणि ठरवलेली मिरवणूक पूर्ण केली. दुसऱ्या दिवशी मग भाईने बैठक घेतली की मिरवणुकीचा अनुभव कसा होता? एक अनुभव म्हणून हे लक्षात ठेवा असे भाईने सांगितलेले लक्षात राहिले. अकरावी संपताना मिनाक्षीपुरमला धर्मांतराच्या घटना घडल्या होत्या आणि त्यावेळी समाजात दुहिचे तापलेले वातावरण होते. त्याला प्रतिसाद म्हणून प्रबोधिनीने समाज ऐक्य समिती स्थापन करून 'समाज ऐक्य पंधरवडा' साजरा करण्याचे ठरले. शिवजयंती ते आंबेडकर जयंती ह्या दरम्यानच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यक्रम करण्याचे नियोजन होते. त्या पंधरवड्याची कोल्हापुरात पूर्वतयारी आणि संपर्क करण्याची जबाबदारी भाईने माझ्यावर सोपवली. मी त्या आधी कोल्हापूर पाहिले देखील नव्हते तरी भाईने माझ्यावर विश्वास ठेवला. मी व प्रकाश दंडनाईक पहाटे कोल्हापुरात पोचलो, सचिन वाझेसह (आता पोलिस अधिकारी) वेगवेगळ्या लोकांच्या, राजकीय कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या, शिक्षकांना भेटलो. ११वी मध्ये असताना तेथील एका महाविद्यालयात शिक्षकांसमोर माहिती देत आंबेडकर चरित्रावर व्याखान दिले. अशा सर्व अनुभवांतून व जबाबदाऱ्यांमधून आमची घडण नकळतच होत गेली. तेव्हा हे सारे लक्षात आले नाही पण आता मात्र प्रकर्षाने जाणवते.

**पुढील शिक्षण**

भाईचा सगळ्यावरच स्नेह होता तरी माझ्यावर विशेष प्रेम व अपेक्षा असाव्यात असे वाटे. मी Veterinary Medical College ला प्रवेश घेतल्याचे कळल्यावर हे काय करतोस तू? हे म्हणजे इंदिरा गांधींनी एखाद्या हॉस्टेलचे रेक्टर व्हावं तसं मला वाटतंय अशी त्याने प्रतिक्रिया दिली! तेव्हा अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय अशी दोनच मुख्य करियर मानली जायची. प्रबोधिनीच्या अनेक उपक्रमांतील सहभागामुळे म्हणा किंवा स्वत:च्या बेफिकीर वृत्तीने, बोर्डाच्या परीक्षेच्या थोडेच आधी अभ्यासाला लागलो आणि परिणामी बी.जे. मेडिकलच्या वेटिंग लिस्टलाच राहिलो. मग ग्रामीण भागांत काम करायची संधी मिळेल असाही विचार केला व पशुवैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. अर्थात Robert Frost च्या The Road Not Taken कवितेचा प्रत्यय यायचा होता.

प्रबोधिनीतून बाहेर पडून मुंबईत महाविद्यालयात गेलो तेव्हा एका एकसुरी जगातून एका वेगळ्या मोठ्या जगात आल्याचे जाणवले. शंभर वर्षे जुन्या कॉलेजमध्ये देशातील विविध भागांतून विविध सामाजिक स्तरांमधील आलेली मुले, वसतीगृह आणि काही प्रथाही होत्या. मुलांना व्यसनांपासून दूर राहण्यासही धाडस लागायचं. मी व माझ्या काही मित्रांनी 'सन्मित्र संघ' स्थापन केला. त्याद्वारे विधायक कार्यक्रम केले आणि व्यसनांपासून दूर राहू इच्छिणाऱ्यांना पाठबळ देऊ शकलो, सकारात्मक राहू शकलो.

प्रबोधिनीचे एक क्रीडा शिबिरही मी परळमध्ये एका सुट्टीत घेतले होते. आशा भोसले रजनीसाठीही काही काम केलं होतं. हे सर्व करताना प्रबोधिनीत बांधून दिलेली शिदोरी वेळोवेळी वापरता आली.

पदवीनंतर Veterinary Pathology विषयात post-graduation करण्यासाठी मला केंद्रीय शिष्यवृत्तीही मिळाली. Bovine Ocular Tumours वर research केला आणि शिक्षण संपायच्या आधीच पुण्यातील एका खाजगी लॅबमध्ये pathologist म्हणून नोकरीही मिळाली.

उच्चशिक्षणानंतर Ph.D. साठी अमेरीकेत संधी मिळत होती. परंतु गेलेले परतत नाहीत व परतणाऱ्यांचे frustration, हे दोन्ही पाहिले होते. जाणीवपूर्वक भारतातच राहण्याचा निर्णय घेतला.

दोन वर्षं पुण्यात काम केल्यावर शिवाजी डांगे या MPSC त प्रथम आलेल्या खास मित्राच्या आग्रहामुळे UPSC ची परीक्षा मराठी वाङ्मय आणि Veterinary Science हे विषय घेऊन दिली. पुण्यात नोकरी करतानाच वर्षभर व नंतर मुंबईत राहून पाच महिने अभ्यास केला. मेरीट मध्ये आलो नाही पण हा तयारीचा काळ खूप आनंद, वैचारिक समृद्धी आणि अनुभव देऊन गेला.

**व्यवसाय**

आता, १९९४ मध्ये मी स्वत::ची लॅब व अन्य व्यवसाय सुरू करण्याची तयारी केली. पण त्याच वेळी Ranbaxy कंपनीची नवीन ड्रग संशोधनासाठी toxicologist हवा असल्याची जाहिरात वाचनात आली. दिल्लीत नोकरी स्वीकारण्याचा

बदल एका छोट्या तळ्यातून मोठ्या सरोवरात गेल्यासारखा झाला. शून्यातून लॅब उभी करण्याचा चांगला अनुभव मिळाला. हा अनुभव माझ्यासाठी नवी कवाडं खुली करणारा ठरला.

याच दरम्यान स्वत:ची Contract Research Organisation सुरू करण्याचा विचार आणखी पक्का झाला आणि १९९५ मध्ये तसा करार करून १९९६ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरवात केली. पाच सहकाऱ्यांसह चालू केलेल्या कंपनीत, INTOX Pvt. Ltd. मध्ये, आज आम्ही तीन संचालक व सुमारे ९० कर्मचारी कार्यरत आहोत. २०२१ या वर्षी माझ्या कंपनीला २५ वर्षं पूर्ण झाली आहेत.




**कर्मक्षेत्र – इंटॉक्स प्रा. लि.**

कुठलीही नवीन औषधे, रसायने किंवा पदार्थ हे गुणवत्तापूर्ण, सुरक्षित आणि परीणामकारक आहेत की नाही हे ठरविण्याचे काम माझ्या संस्थेत चालते. त्यांचे दुष्परीणाम तपासले जातात. माझ्याकडे यासाठी सुसज्ज Laboratory Animal House आहे.

Mammalian Toxicology, Clinical Pathology, Histopathology, Inhalation Toxicology, Analytical Chemistry, Physical-Chemical Testing, Bio analytical Research, In vitro and Genetic Toxicology, Environmental Toxicology, Molecular Biology/ Immunology / Microbiology अशा सुसज्ज प्रयोगशाळा आहेत. आंतरराष्ट्रीय GLP certificate आम्हाला २००७ मध्ये मिळाले. ग्राहक जगभर पसरले. २०१० मध्ये मी परीक्षा देऊन अमेरिकन बोर्ड सर्टिफिकेशन (DABT) मिळविले व ते २०२५ पर्यंत कायम राहील. जगभर व्यवसाय वाढवायला त्याचाही उपयोग झाला. २०२० पासून software driven कार्यप्रणालीही राबवली आहे.




**चीन – शांघाय येथे प्रदर्शनात**

आमच्या कंपनीत कोणा बाह्य संस्थांची गुंतवणूक नसल्याने आमचा उद्देश नफा कमावणे हा कधीच राहिला नाही. त्यामुळे आम्ही स्वत:च्या गतीने, चोखंदळपणे काम करू शकलो, गुणवत्ता सांभाळू शकलो. विविध प्रकारच्या उद्योगांना product safety assessment आवश्यक असते ती सेवा आम्ही देतो. यात pesticides, pharmaceuticals, biologics, medical devices, nutraceuticals व इतर रसायने व पदार्थही येतात.

आज कोविडच्या काळात माझे काम आणखीनच वाढले. आम्ही तीन भारतीय आणि एका परदेशी कंपन्यांबरोबर कोव्हिड लसींवर safety / efficacy studies करतो आहोत. कोविड अँटिसिरमसाठी दोन कंपन्यांबरोबर काम चालू आहे. न्युमोनिया संदर्भात उपाय म्हणून वापरता येतील अशा stem cells व अन्य औषधांवरही काम चालू आहे. DRDO सह इतर कंपन्यांना जंतूनाशके गुणवत्ता जपून लवकरात-लवकर बाजारात आणण्यास मदत केली. ताप मोजायच्या टिकलीवर टेस्टींग करून दिले. या शिवाय NCL, JNU, आयसर, दिल्ली IIT येथील संशोधकांसह कामे सुरू / प्रस्तावित आहेत.

इसापाच्या पंचतंत्रातील व शहाणपणाच्या गोष्टी आपण लहानपणी ऐकतो तेव्हा त्या आपल्याला नीट कळत नाहीत. मात्र जेव्हा मोठेपणी आपण प्रत्यक्ष काम करतो तेव्हा त्यांचा प्रत्यय येतो. अशीच सत्ये २५ वर्षं सातत्याने व्यवसाय केल्यावर मलाही उमगली. आपण प्रबोधिनीमध्ये कायम म्हणतो, की उत्तमतेचा आग्रह धरला पाहिजे, तसा मी व्यवसायातही धरत गेलो. दुसरा आग्रह प्रामाणिकपणाचा. आपल्या कामाला आपणच महत्त्व द्यावे लागते तरच इतर लोकदेखील त्याला महत्त्व देतील असा 'धर्मो रक्षति रक्षित:' ह्या उक्तीचा प्रत्ययच मला आला. व्यवसायात आपण आपल्या मूल्यांपासून ढळलो नाही तर निश्चित यश मिळते. आपली क्षमता आपण संपूर्णपणे वापरायला हवी, घेतलेली जबाबदारी पूर्णत्वास न्यायला हवी. आपल्याकडच्या कामात आपण नेहमी काहीतरी नवीन करायला हवे, काही गुणात्मक भर घालायला हवी. नफा आणि उलाढाल ह्या गोष्टी तात्कालिक असतात. तुम्ही तुमच्या ग्राहकाचे समाधान करू शकलात तर तेच आपल्याकडे पुन्हा-पुन्हा येऊ लागतात आणि आपले प्रचारक होतात. आपले कर्मचारी-सहकारी ह्यांची काळजी घेणे हे देखील खूप महत्त्वाचे आहे. योग्य व हुशार

सहकाऱ्यावर विश्वास ठेऊन गटबांधणी महत्त्वाची असते. व्यवसाय करताना योग्य सहकारी निवडायला हवेत. त्यासाठी त्यांची वृत्ती आणि मूल्ये तुमच्या सारखी असायला हवीत, नाहीतर काही कालावधी नंतर तुम्हाला स्वत:ची निवड चुकल्यासारखे वाटू शकते. असे चुकल्यासारखे वाटले तरीही नफ्या-तोट्याचा फार विचार न करता तेथून बाहेर पडावे. गरज पडली तर हिमतीने एकट्याने पुन्हा व्यवसाय सुरू करावा, पण आपल्या मूल्यांशी तडजोड करू नये.

काम मोठे करायचे असेल तर नेतृत्वाची तपासणी हवी. नेता प्रामाणिक आणि जबाबदार असला पाहिजे. तो बोलतो तसा वागला तर कर्मचारीही अधिक कार्यक्षमतेने काम करतात. आप्पांनी सर्वांना एकाच ध्यासाने आतून-बाहेरून भारावून टाकले होते. त्यातूनच लोक जोडले गेले आणि प्रबोधिनीचा विस्तार झाला. नेत्यासमोर असे मोठे ध्येय पाहिजे, ज्यासाठी लोक काम करू शकतील. प्रत्येक सदस्याला असे वाटायला हवे, की आपण मानवतेच्या आणि जगाच्या दृष्टीने महत्त्वाचे एक काम करतोय! केवळ नफा आणि पैसा असे ऐहिक ध्येय न ठेवता त्याहून मोठे ध्येय सर्वांसमोर असायला हवे. नेता स्वत: सर्वांगीण बाजूने संतुलित व्यक्तिमत्त्वाचा आणि धाडसी असायला हवा. आपल्याला काय कळत नाही हे त्याला कळून मग ते काम समजणारे लोक नेत्याला जोडता आले पाहिजेत.

कधीही Business Management कुठल्या विद्यापीठात शिकलो नाही पण या शास्त्राचे मूलभूत धडे आपण आधीच प्रबोधिनीतच गिरवले असल्याचे लक्षात येत गेले!

**प्रबोधिनीतील संचित**

काही संस्कार आणि मूल्ये माझ्या पालकांनी माझ्यात रुजवली, ती प्रबोधिनीच्या संस्कारांशी सुसंगत असल्याने वर्धित झाली. उद्यमशीलता हा गुण जसा वडिलांकडून घेतला तसाच आप्पांकडूनही घेतला. मी आप्पांना क्षणमाप विभाग, कपॅसिटर विभाग, शिवापूरची यंत्रशाळा, खांडसरी साखर कारखाना, उद्वाहक विभाग, रसमयी उद्योग, ट्रकच्या बॉडी बांधणे, असे अनेक उद्योग उभारलेले पाहिले. आप्पा एक 'सिरियल आंत्रप्रेनर' होते. मी त्यांचा उद्योगजगतेचा संस्कार थोडा तरी आत्मसात करू शकलो.

स्वावलंबन, उत्तमतेचा आग्रह, आपल्याला अशक्य काही नाही, आपण हे करून दाखवू म्हणण्याची वृत्ती आणि प्रत्यक्ष आचरण असे मुख्य गुण मी प्रबोधिनी मधून शिकलो. आव्हान घेऊन श्रमपूर्वक, एखादी गोष्ट लाज न बाळगता पूर्ण करणे आणि त्यात स्वत: समोर राहून नेतृत्व करायला मी शाळेत शिकलो. कार्यक्रम झाला की सतरंज्या उचलायलासुद्धा स्वत: पुढे राहून आदर्श निर्माण करायचा, त्याला आपण 'स्वयमेव मृगेंद्रता' म्हणतो. हा गुण नक्कीच प्रबोधिनी मधून आला. प्रत्येक कामात मूल्यांचे व नैतिकतेचे अधिष्ठान असणे आणि मूल्यसंवर्धन करणे हा मोठा संस्कार मिळाला. पराभवाला, अपयशाला न घाबरता विकासाकडे लक्ष देणे अशा गोष्टी प्रबोधिनीत शिकायला मिळाल्या. अशा प्रकारे प्रबोधिनीतून काय शिकलो आणि कोणत्या गुणांचे संवर्धन झाले याची मोठी यादीच तयार होऊ शकेल.

प्रबोधिनीत अनेक गुरू मला भेटले. त्यांच्या आचरणातूनच शिकायला मिळाले. मा. आण्णांचा कामाचा झपाटा , मा. वामनराव व मा. यशवंतरावांची अभ्यासू क्रीयाशीलता, साधेपणा, याचबरोबर शरदराव, भाई, विसूभाऊ, मोहनराव, अजितराव, अविदा, अशोकराव, नलूताई, लताताई, पुष्पाताई, अनंतराव, सुभाषराव, गिरीशराव ... अशी या गुरूजनांची मोठीच यादी होईल! प्रबोधिनीतील या सर्वांचे आमच्याशी नि:स्पृह नाते होते. ह्या सगळ्या लोकांनी स्वत:ची करियर सोडून आम्हाला वेळ दिला, आम्हाला घडवले. त्यामुळे त्यांनाच मी गुरू मानतो व त्यांचा सदैव ऋणी राहीन. त्यांच्यामुळे प्रबोधिनीत स्वत:तील सुप्त शक्तीची जागृती झाली, आत्मविश्वास मिळाला, त्याचा बाहेर पडल्यावर मोठा उपयोग झाला. रूप पालटू देशाचे हा इथे रुजलेला मंत्र खोलवर जपला गेला.



**मा. लताताईंसह मी व अनिता**

माझ्या सद्भाग्याने १९९१ मध्ये माझा विवाह प्रशालेच्याच माजी विद्यार्थिनी व युवती कार्यकर्ती असलेल्या अनिताशी झाला, त्याचे पौरोहित्य मा. वामनरावांनी केले

व मा. लताताई, हेमाताई यांचेही आशीर्वाद लाभले. अनिताच्या रूपाने घरातही प्रबोधिनीचे नाते चालू राहिले. तिचा मला सतत प्रोत्साहन व आधार मिळतच गेला, ज्यामुळेही मी व्यवसायाला अधिक वेळ देऊ शकलो. आजवर हातून घडत गेलेली कामे ही आई-वडील व अनिता यांच्या पाठिंब्यामुळेच झाली असे मी मानतो.

प्रबोधिनी मधून बाहेर पडल्यावर वैविध्य अनुभवायला मिळाले. एकाच प्रकारच्या संस्कृतीमधून बाहेर येऊन ह्या वैविध्याचा देखील आपण स्वीकार आणि सन्मान करायला पाहिजे हे जाणवले! अनेक वेगवेगळ्या सामाजिक स्तरातील लोक आहेत आणि त्यांची वेगवेगळी कहाणी असते त्यांना देखील आपण समजून घेऊन स्वीकारू शकलो पाहिजे. ते आपल्यापेक्षा वेगळे का आहेत? आणि वेगळे आहेत म्हणजे आपल्यापेक्षा कमी आहेत असे मनात येता कामा नये हे समजले. प्रबोधिनी एक सामाजिक संस्था असल्याने खर्चाच्या बाबतीत दोनदा विचार करणे आवश्यकच होते. आपले बहुतेक कार्यकर्ते व शिक्षक मध्यमवर्गीय होते. एक सोडले तर कुणी उद्योजक नव्हते आणि त्यामुळे आर्थिक संपन्नतेचे विचार आपोआप मर्यादित व्हायचे. बाहेर गेल्यावर पैसे मोठ्या प्रमाणावर मिळवायला हवेत आणि 'पैसे मिळवणे हे काही पाप नाही' हे लक्षात आले. बाहेर गेल्यावर लक्षात येते, की हे जग प्रबोधिनी शिवाय देखील चालू आहेच! मग आपण नक्की ह्या जगात काय वेगळेपण आणू शकतो आणि त्यासाठी आपण कसे प्रयत्न करू शकतो हा विचार करता आला!

अनेक वेळा लोक म्हणत, की प्रबोधिनीमध्ये राहून फक्त तुमच्या अहंकाराचे फुगे फुगले, पण असे काही मला वाटत नाही. प्रबोधिनीमध्ये स्वत:च्या सुप्त शक्तीची जाणीव झाली आणि उत्तमतेचा आग्रह धरण्याचा आत्मविश्वास आला. हा वैचारिक प्रवास चालूच आहे.


पुण्यात आणि ते ही सदाशिव पेठेत खूप मर्यादित जगाशी संपर्क होतो आणि एक विशिष्ट विचारसरणी आपण पाळतो. पण त्यातून येणाऱ्या मर्यादा देखील आपण ओलांडायला हव्यात. विविध विचारसरणींचा अभ्यास आपण करायला हवा. दलित चळवळीशी आपला मोठा disconnect आहे असे मला वाटते. उजव्या विचारसरणी मधून बाहेर पडून सर्व लोकांत मिसळून आपण काम केले तर आपल्या अनेक मर्यादा ओलांडल्या जातील. अनेक लोक आज असे पाहतो ज्यांची वैचारिक वाढ तिथेच खुंटली आहे आणि नवीन विचारही मनांत येत नाहीत. तरुण प्रबोधकांनी उघड्या डोळे, कान आणि बुद्धीने बाहेरचेही जग पहावे. त्यासाठी अजून ५० वर्षे वाट पाहू नये.

मधल्या काळात प्रबोधिनीशी संपर्क कमी झाला, संवाद कमी झाला मात्र ती कधी दुरावली नाही, तर सोबत होतीच व कायम सोबत राहील! प्रबोधिनीबद्दल मी असेही म्हणेन की,

"There is a sense of an immense gratitude and love for Jnana Prabodhini. Prabodhini still remains a model of self-less and relevant work, and a source of inspiration for me. Prabodhini stays at my heart at all times and in all walks of life. At times of making difficult decisions, I have to shuffle through the pages of Prabodhini-Book that lies inside my brain, to find some guidance, and do I get it from there. I do not need to connect to anyone of my revered mentors of Prabodhini in real world and real time. I do not have to meet them in person from time to time. They have given everything I needed for my life and they are always present in my mind and heart and guide me instantly when I pose them a query. That is how Prabodhini should be a part of our life".

प्रबोधिनीच्या माध्यमातून काम करणे म्हणजे रोज वास्तूत जाणे असे नसून आपली शिदोरी आपण नीट बांधून घ्यायची व लागेल तशी ग्रहण करायची असाच असावा!







## Rapid Fire

१. आवडता चित्रपट - Matrix triology

२. आवडते पुस्तक - कुसुमाग्रज, करंदीकर, मर्ढेकर आणि सुरेश भटांच्या कविता वाचायला आवडतात. एक असे पुस्तक नाही.

३. आवडता संशोधक - मोठी यादी आहे, एक निवडणे अवघड आहे.

४. तुमचा छंद/ आवड - कविता आणि ट्रेकिंग, सायकलिंग. मागच्या वर्षी न्यूझीलंड, युरोपमध्ये व अरुणाचलला सायकलिंगला गेलो होतो.

५. पहिली प्रतिक्रिया :

- वैद्यकशास्त्र - हॉस्पिटल्स, त्यातही आपले मंगेशकर हॉस्पिटल
- Vaccine - कोविड आणि सिरम
- पुणे - ज्ञान प्रबोधिनी
- आप्पा पेंडसे - दीपस्तंभ
- ज्ञान प्रबोधिनी - आप्पा

६. जर पुन्हा नव्याने आयुष्य जगायची संधी मिळाली तर काय व्हायला आवडेल/कोणत्या क्षेत्रात काम करायला आवडेल? (आत्ताच्या क्षेत्रा व्यतिरिक्त)

- मला माझा मुलगा आता जे करतोय ते सामाजिक शास्त्र किंवा इतिहास, पुरातनशास्त्र, भूगर्भशास्त्र असे विषय हाताळायला आवडतील. माझ्या मुलाकडून मी नवनवीन गोष्टी शिकत आहे!

**नरेन्द्र देशमुख**
9822056023
naren.outreach@gmail.com

**मुलाखत व शब्दांकन - श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे    संपादन - मानसी बोडस, पल्लवी गोखले - नगरकर**

**आरेखन व मांडणी - निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org